# कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठीची जाहिरात

**जाहीरात क्र. ०१/२०१५ दिनांक : २३/ ०४/२०१५**

वरीष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा यांचे अंतर्गत येणा-या जिल्हास्तरीय व उपविभागीयस्तरीय प्रयोगशाळांमध्ये आणि जिल्हास्तरीय सनियंत्रण कक्षांसाठी आवश्यक असलेले ११ महीने कालावधीसाठी खालील प्रमाणे प्रवर्गनिहाय **कंत्राटी पदे** भरणेसाठी पदांची अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविणेत येत आहेत.

**१. भरावयाची पदे, पदसंख्या, आरक्षित पदे व शैक्षणिक अर्हता, अनुभव व मानधन खालील प्रमाणे**

| अ. क्र. | पदनाम | पदसंख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मानधन रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | रसायनी | ०१ | अ ज-१ | १) बी.एस्सी.(रसायनीशास्त्र), MS-CIT, उत्तीर्ण प्राधान्य -एम.एस्सी. (रसायनीशास्त्र),<br>२)प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीचा/पाणी गुणवत्ताविषयक कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव | १२०००/- |
| २ | अनुजैविक तज्ञ | ०१ | अ जा-१ | १)बी.एस्सी.(सूक्ष्मजीवशास्त्र), MS-CIT, उत्तीर्ण प्राधान्य -एम.एस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र)<br>२)प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीचा/पाणी गुणवत्ताविषयक कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव | १२०००/- |
| ३ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ०६ | अ.जा.-१<br>अ.ज.-१<br>विजाभज -१<br>खुला-३ | १)एच . एस.सी उत्तीर्ण MS-CIT, उत्तीर्ण मराठी व इग्रंजी टायपिंग अनुक्रमे ३० व ४० शब्द प्रती मिनीट व इंटरनेट वापराबद्दल माहिती आणि पदवीधर असणा-यास प्राधान्य.<br>२) पाणी प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीचा/पाणी गुणवत्ताविषयक माहीतीच्या नोंदी घेण्याच्या कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव | १००००/- |
| ४ | प्रयोगशाळा सहाय्यक | १० | अ.जा.-१<br>अ.ज.-१<br>विजाभज -१<br>इ.मा.व.-२<br>खुला-५ | १)एच . एस.सी उत्तीर्ण (विज्ञान शाखा) व पदवीधर असणा-यास प्राधान्य.<br>२) प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्ताविषयक काम करणा-यास प्राधान्य. | ८०००/- |
| ५ | प्रयोगशाळा मदतनीस /मदतनीस | ०२ | अ.जा.-१<br>अ.ज.-१ | १)एस्.एस्.सी उत्तीर्ण /दहावी उत्तीर्ण.<br>२) प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्ताविषयक काम करणा-यास प्राधान्य. | ६०००/- |
| ६ | सँपलींग असिस्टंट | १० | अ.जा.-१<br>अ.ज.-१<br>विजाभज-१<br>इ.मा.व.-२<br>खुला-५ | १)एस्.एस्.सी उत्तीर्ण /दहावी उत्तीर्ण.<br>२) प्रयोगशाळेतील पाणी गुणवत्ताविषयक काम करणा-यास प्राधान्य. | ८०००/- |

**२. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सुचना.**

२.१ अर्ज भरण्यापुर्वी उमेदवारांनी सदरील जाहीरात सविस्तर अभ्यासावी.

२.२ अर्ज भरताना उमेदवांराचे नाव एकदा मराठीत व एकदा इग्रजीत भरावीत इग्रजीत नाव भरताना CAPITAL LETTERS मध्ये भरावे.

२.३ अर्जात हेतुपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवुन ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परिक्षा कक्षातील गैरवर्तन, परिक्षेचे वेळी, नक्कल करणे, व वशीला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परिक्षा कक्षाचे बाहेर अथवा परिक्षा नंतरही गैरप्रकार करणा-या उमेदवारांना गुण कमी करणे विशिष्ठ किंवा सर्व परिक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मा.वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा यांना असतील.तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पुर्ण न करणारा अथवा गैरवर्तणुक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

२.४ वय, शैक्षणिक अर्हता, यांचा अर्जामध्ये केलेला दावा बदलता येणार नाही.

२.५ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-यांने दिलेल्या जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-यांने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येईल.

२.६ एस.एस.सी./मॅट्रीक्युलेशन अथवा शाळा सोडण्याचा दाखला, जन्माचा दाखला या प्रमाणपत्रावरील जन्मदिनांकानुसार अर्जामध्ये जन्मदिनांक निवडावा.

२.७ शैक्षणिक अर्हते संदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमुद करावी.संबधीत परिक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

२.८ **उमेदवाराने अर्जासोबत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे अगर त्यांच्या सत्यप्रती सादर करु नयेत केवळ विहित नमुन्यातील अर्ज व अर्जावरील फोटो स्वसाक्षांकित करुन पूर्ण भरलेला अर्ज सादर करावा. लेखी परिक्षा झालेनंतर केवळ निकषानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे छाननी झालेनंतरच पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविणेत येईल. उमेदवाराने संबंधित पदाच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा. मूळ कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ लेखी परिक्षा दिली म्हणून संबंधित पदांसाठी कोणत्याही प्रकारचा हक्क अगर दावा सांगता येणार नाही.**

२.९ अर्जामध्ये चुकीची माहीती सादर करणा-या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविणेत येईल.

२.१० अर्जाचा नमुना सोबत देण्यात येत आहे. हा नमुना A-4 साईज पेपरवर एकाच बाजूला टंकलिखित करून उमेदवाराने अर्ज पूर्ण भरावा व स्वाक्षांकित केलेला अलीकडच्या काळातील रंगीत पासपोर्ट साईज दिलेल्या जागेत चिकटविण्यात यावा.

२.११ **अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख** : **०५/०५/२०१५ साय. ५.०० वा.पर्यंत**

**अर्ज स्विकारण्याचा पत्ता -** वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जुनी लोकल बोर्ड इमारत, जिल्हा परिषद आवार, सातारा **दूरध्वनी क्र. (०२१६२ )२३७५८६ / २३२३४७**

**ईमेल - srgeo_satara@yahoo.com**

**३. वयोमर्यादा :-** सर्व पदांसाठी वयाची अट ही किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे राहील.

**४. परिक्षा शुल्क :-** खुला प्रवर्गासाठी रु.३००/- व राखीव प्रवर्गासाठी रु.१५०/- असे परिक्षा शुल्क राहील. माजी सैनिक यांना परिक्षा शुल्क लागू नाही. विहित परिक्षा शुल्काप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा व सातारा येथे देय असलेल्या रेखांकित डिमांड ड्राफ्ट (धनाकर्ष) वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा या नावे धनाकर्ष अर्जासोबत जोडणेत यावा. परिक्षा शुल्काचा धनाकर्ष जोडला नसल्यास, त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**५. निवड प्रक्रिया :-**

५.१ जाहिरातीमध्ये नमुद पदाकरीता उमेदवांराची निवड लेखी परिक्षेमध्ये/कौशल्य चाचणीमध्ये मिळणा-या एकुण गुणांच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल.

५.२ प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननी नंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांची ५० गुणांची लेखी परिक्षा (डाटा एन्ट्री ऑपरेटर वगळुन) आणि डाटा एंट्री ऑपरेटर यांची ५० गुणांची कौशल्य चाचणी (Skill Test ) घेण्यात येईल. तद्नंतर सर्व

पदासाठी २५ गुणांची तोंडी परिक्षा घेणेत येईल. **तसेच एका उमेदवाराने कोणत्याही एकाच पदासाठी अर्ज करावा.**

५.३ पद क्र.१,२,४,५ व ६ साठी ५० गुणांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ लेखी परिक्षा घेणेत येईल. लेखी परिक्षेमध्ये एकुण ५० प्रश्नाकरीता १ तासाचा कालावधी राहील. तसेच सदरील उमेदवारांना २५ गुणांची तोंडी परिक्षा घेणेत येईल.

५.४ डाटा ऐन्ट्री ऑपरेटर पदाकरीता ५० गुणांची कौशल्य चाचणी (Skill Test) घेण्यात येईल त्यास १५ मिनीटांचा कालावधी असेल तद्नंतर २५ गुणांची तोंडी परिक्षा घेणेत येईल.

५.५ सविस्तर माहितीसाठी शासनाच्या संकेतस्थळावर **(२०१५०२२३११६२२२०२८)** उपलब्ध असलेल्या महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र.डब्लूक्यूएम-२०१४/प्र.क्र.५९/पापु-१२ दिनांक २३ फेब्रुवारी २०१५ चा पहावा.

५.६ लेखा परिक्षेचे ठिकाण, दिनांक,वेळ, तसेच बैठक क्रंमाक इत्यादीची माहिती **जिल्हा परिषद, सातारा येथील नोटीस बोर्डवर** तसेच परिक्षा प्रवेश पत्र उमेदवारांच्या अर्जात नमुद पत्त्यावर पोष्टाने पाठविण्यात येईल. प्रवेश पत्र न मिळाल्यास संबधीत सदस्य सचिव यांच्या कार्यालयातुन विहीत मुदतीत म्हणजेच परिक्षेच्या दिनांकापुर्वी दोन दिवस आधी कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन घेणेची जबाबदारी उमेदवारांची राहील.

**६. इतर सर्वसाधारण सुचना, अटी व शर्ती-**

६.१ उमेदवार हा भारतीय नागरीक असावा व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. त्याला मराठी भाषेचे ज्ञान असावे. उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहीत केलेले सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

६.२ सदरची पदे कंत्राटी पद्धतीने भरावयाची असलेने ठोक वेतन अनुज्ञेय राहील. तसेच निवड झालेनंतर कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देताना विहीत नमुन्यातील रू.१००/- च्या मुद्रांकपत्रावर बंधपत्र (करारनामा) देणे बंधनकारक राहील.

६.३ कंत्राटी तत्वावर नेमलेल्या कर्मचा-यांना या कंत्राटी सेवेच्या आधारे शासनाच्या नियमित सेवेत सामावून घेतले जाणार नाही व याबाबत त्यांना न्यायालयात दाद मागता येणार नाही.

६.४ सेवायोजन कार्यालयाकडे नोंद असणा-या उमेदवारांनीही विहीत पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

अर्ज करण्याबाबतच्या व इतर सर्वसाधारण सुचनांचे उमेदवारांनी काळजीपुर्वक अवलोकन करुन अर्ज करावेत.

**स्वाक्षरीत/-**
**मा.सदस्य सचिव निवड समिती**
**तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक**
**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा**

**स्वाक्षरीत/-**
**मा.अध्यक्ष निवड समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परीषद सातारा**

**प्रपत्र अ**
**(अर्जाचा नमुना)**

| |
|---|
| स्वतः साक्षांकित केलेला आयडेंडी साईज फोटो |

प्रति,

मा.सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती सातारा
तथा --------------------------------------
विभागाचे नांव -----------------------------
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा.

**भरती पदाचे नांव :- -----------------------------------**

**१)** अर्जदाराचे संपूर्ण नांव (नांव प्रथम) :- ----------------------------------------------------

**२)** उमेदवाराचे नावात बदल असलेस (नांव प्रथम) :- -----------------------------------------
(सोबत कागदोपत्री पुरावा आवश्यक)

**३)** अर्जदार स्त्री आहे की पुरुष, **स्त्री / पुरुष** **विवाहित / अविवाहित**
(लागू नसेल ते खोडावे)

**४)** पत्रव्यवहाराचा पत्ता :- -----------------------------------------------------------------

४अ) दूरध्वनी / मोबाईल क्रमांक :- दू.क्र. ---------------------- / मोबाईल ------------------

**५)** जात :- ----------------------------- पोटजात :- --------------------------------------

५अ) जातीचा प्रवर्ग
(योग्य ठिकाणी अशी खूण करावी.)

| अनु जाती | अनु जमाती | विजा (अ) | भ.ज.ब. | भ.ज.क. | भ.ज.ड. | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

**६)** अर्जदाराची जन्मतारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार) तारीख -------- महिना -------- वर्ष --------
**७)** अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दिनांक :- / /२०१५ रोजीचे असणारे वय
वर्ष ------------- महिना ------------ दिवस ------------
**८)** अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल)

| शैक्षणिक पात्रता | परीक्षा मंडळाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९) पुर्वानुभव असल्यास :-

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) परिक्षा शुल्क फी :- मागासवर्गीय :- होय / नाही

अ) धनाकर्ष (डी.डी.) क्रमांक --------------------------- व दिनांक --------------------

रक्कम रुपये ---------------------------------------

मी श्री. --------------------------------------------------- प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. मी प्रमाणित करतो/करते की, अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आलेस अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कारवाईस पात्र व बांधील राहीन.

स्थळ :-

दिनांक :- / /२०१५ **अर्जदाराची स्वाक्षरी**

(अर्जदाराचे नांव -------------------------------------)

**प्रपत्र ब**

<u>महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटूबांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना - अ</u>

**<u>प्रतिज्ञापत्र  (नियम ४ पहा)</u>**

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------ श्री.---------------------------- यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी वय --------- वर्ष राहणार ------------------------------------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते/करतो की,

१) मी ---------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ------------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ तद्‌नंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

**ठिकाण -**

**दिनांक -** **अर्जदाराची सही**

**अर्जदारांचे संपुर्ण नांव.-------------------------**

**प्रपत्र क**

वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,सातारा
यांचे कंत्राटी पदासाठी भरती प्रक्रिया २०१५
लेखी परिक्षेचे प्रवेश पत्र

| | |
|---|---|
| उमेदवारांचे बैठक क्रमांक | परिक्षेचा दिनांक व वेळ<br>दि. / /२०१५ वेळ - |
| | |
| उमेदवारांचे नांव व संपुर्ण पत्ता | |
| लिंग - | पदनाम - |
| परिक्षा केंद्राचे नांव | |
| परिक्षा केंद्राचे पत्ता | |

या ठिकाणी उमेदवारांनी
अलीकडील काळातील
आयडेंटी साईज फोटो लावावा
व तो राजपत्रित अधिकारी
किंवा सक्षम अधिकारी
यांचेकडून साक्षांकीत करावा.

उमेदवाराची स्वाक्षरी

मा.सदस्य सचिव निवड समिती
तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सातारा

**सूचना :-**

१. सदर परिक्षेचे दिलेला प्रवेश, उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व त्या पदासाठी विहीत केलेल्या प्राथमिक तपासणीच्या अधीन राहुन तात्पुरता दिलेला आहे. परिक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवाराची पात्रता, मुळ प्रमाणपत्रे अंतीम निकालापुर्वी किंवा त्यानंतर कधीही तपासण्यात येईल. त्यावेळी एखादा उमेदवार अपात्र असल्याचे आढळुन आल्यास त्याची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२. उमेदवारांनी या प्रवेशावर, तसेच परिक्षेच्या वेळी देण्यात येणा-या उत्तरपत्रिकेवर व प्रश्नपत्रिकेवर दिलेल्या सुचना अंत्यत काळजीपुर्वक वाचून त्यांचे पालन करावे. सुचनाचे पालन न करणारा उमेदवार परिक्षा कक्षाबाहेर घालवुन देणे, त्यास संबधीत परिक्षा अथवा निवडीस प्रतिरोधीत (DEBAR) करणे, अपात्र ठरविणे, उमेदवारी रद्द करणे यापैकी एक किंवा अधिक शिक्षा देण्यास पात्र ठरेल.

३. प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी परिक्षेचा कालावधी १ तासाचा असेल.

४. उमेदवारांनी परिक्षा कक्षात पेपरसाठी वेळेआधी अर्धा तास अगोदर येणे आवश्यक आहे. हा कालावधी उमेदवारांची हजेरी तपासणे, उत्तरपत्रिका देणे व सुचना देणे यासाठी राहील.

५. पेपरसाठी परिक्षा वेळेतच येणा-या उमेदवारांनाच परिक्षा कक्षेत प्रवेश देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थीतीत परिक्षा कक्षेत परिक्षा साठी प्रवेश देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

६. परिक्षा कक्षात प्रवेश मिळण्यासाठी सदर प्रवेश प्रमाणपत्र तसेच फोटो असलेल्या इतर ओळखपत्रापैकी एक ओळखपत्र परिक्षाच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

७. प्रवेशपत्रावरील छायाचित्रास विशेष कार्यकारी अधिकारी किंवा राजपत्रित अधिका-यांची स्वाक्षरी व शिक्का याप्रकारे घ्यावे कि अर्धी स्वाक्षरी व शिक्का व फोटोवर आणि अर्धी खाली कागदावर येईल. ही पुर्तता नसल्यास परिक्षेस बसता येणार नाही. तसेच लिफाफयावर ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा ठळक अक्षरात उल्लेख करावा.

८. उमेदवारांना उत्तरपत्रिका स्वंतत्रपणे पुरविण्यात येईल. उत्तरपत्रिकेवरील सुचना काळजीपुर्वक वाचुन त्यांचे काटेकोरपणे पालन करावे. त्यावर उत्तरे/माहिती लिहीण्यासाठी काळया शाईचे बॉलपेन वापरावे. इतर शाईचे बॉलपेन/ शिसपेन्सिल/ रंगीत पेन्सिल वापरण्यास सक्त मनाई आहे. या सुचनेचे उल्लंघन केल्यास अशी उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही.

९. परिक्षाच्या वेळी हजेरीपटावर उमेदवाराने केलेली स्वाक्षरी, परिक्षेच्या आवेदनपत्रावर केलेल्या स्वाक्षरीशी व उत्तरपत्रिकेवरील स्वाक्षरीशी जुळणारी असावी. अन्यथा त्यास परिक्षेस बसु दिले जाणार नाही.

१०. परिक्षे बाबत सर्वच हक्क निवड समितीकडे राहतील.

-----------------------------------------------------------------------------------------------

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा सातारा **पोहोच पावती**

यांचे कंत्राटी पदासाठी भरती प्रक्रिया २०१५

उमेदवाराचे नाव - ------------- ------------- --------------

उमेदवाराचे बैठक क्रमांक - दिनांक - / /२०१५ वेळ -

पदाचे नाव - --------------

**परिक्षा केंद्राचे नाव -** **समवेक्षकाची स्वाक्षरी**